सन २०१८-२०१९ करिता ताडी अनुज्ञप्ती लिलाव-नि-निविदा पध्दतीव्दारे वितरीत करणे - मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक: टीओडी-०८१८/प्र.क्र.१८२/राउशु-३.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ३१ ऑगस्ट, २०१९.

संदर्भ :- १) शासन अधिसूचना, गृह विभाग, दि.४ जून, २००१
२) शासन अधिसूचना, गृह विभाग, दि.९ ऑगस्ट, २०१०.
३) शासन निर्णय, क्र.टीओडी-०६१५/प्र.क्र.११६/राउशु-३, दि.२५.०८.२०१५.
४) शासन निर्णय, क्र.टीओडी-०६१५/प्र.क्र.११६/राउशु-३, दि.२८.१०.२०१६.
५) शासन निर्णय, क्र.टीओडी-०६१५/प्र.क्र.११६/राउशु-३, दि.२.१२.२०१६.
६) शासन निर्णय, क्र.टीओडी-०७१७/प्र.क्र.२१९/राउशु-३, दि.२१.०८.२०१७.
७) शासन निर्णय, क्र.टीओडी-०८१८/प्र.क्र.१८२/राउशु-३, दि.३०.०८.२०१८.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र ताडी दुकाने (लिलाव-नि-निविदा पध्दतीव्दारे अनुज्ञप्ती देणे) आदेश २००१ नुसार, संदर्भाधीन दि. ३० ऑगस्ट, २०१८ च्या शासन निर्णयान्वये, ताडी वर्ष २०१८-२०१९ करिता ताडी दुकाने लिलाव-नि-निविदा पध्दतीने वितरीत करण्याच्या विहित पध्दतीनुसार अटींच्या अधीन राहून टीडी-१ अनुज्ञप्त्यांचे वितरण बोलीधारकांना करण्यात आले आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र ताडी दुकाने (लिलाव-नि-निविदा पध्दतीव्दारे अनुज्ञप्ती देणे) आदेश २००१ नुसार राज्यातील ताडी अनुज्ञप्त्याकरिता सन २०१९-२०२० या वर्षाकरिता पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

१) सन २०१८-१९ मध्ये कार्यरत असलेल्या टीडी-१ अनुज्ञप्त्यांना मागील वर्षाच्या शुल्काच्या तीन महिन्यांच्या प्रमाणात रक्कम वसूल करुन, दोन महिन्यांपर्यंत म्हणजे दि.३१ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२) सन २०१९-२० या ताडी वर्षासाठी दि.१ नोव्हेंबर, २०१९ ते दि.३१ ऑगस्ट, २०२० या कालावधीसाठी राज्यातील टीडी-१ अनुज्ञप्ती वितरणासाठी लिलाव-नि-निविदा प्रक्रीया राबविण्याबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८३११८३४४५४१२९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhakar Shahaji Yadav

Digitally signed by Sudhakar Shahaji Yadav
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3e782c1e59acd749fc48c691d7a8c477d6ac39c1904204f442b52d728d48a67a, cn=Sudhakar Shahaji Yadav
Date: 2019.08.31 18:40:31 +05'30'

(सु.श.यादव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. मंत्री (राउशु) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. राज्यमंत्री (राउशु) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. प्रधान सचिव (राउशु) यांचे स्वीस सहायक, मंत्रालय, मुंबई,
५. खाजगी सचिव, विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
६. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७. सर्व विभागीय आयुक्त,
८. सर्व जिल्हाधिकारी,
९. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
१०. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
११. निवड नस्ती.